# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मूर्तीकार, पर्यावऱणप्रेमी आणि नागरिकांच्या सहभागाने मिरा भाईंदर महानगरपालिका राबविणार पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी दर महिन्याला 'बाप्पा कट्टा'**

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने महिन्याला बाप्पा कट्टा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या बाप्पा कट्ट्यामध्ये दर महिन्याला मूर्तिकार, मूर्तिकार संघटनांचे पदाधिकारी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण प्रेमी तसेच नागरिक हे सहभागी होऊन पर्यावरण पर्यावरण पूरक गणेशोत्सवाकरिता धोरणात्मक नियोजन करणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यंदा 'बाप्पा माझा शाडूचा' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. त्यानिमित्ताने आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात शहरातील गणेश मंडळे, मूर्तिकार, पर्यावरणप्रेमी, सामाजिक आणि राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांच्या अध्यक्षतेखाली हे चर्चासत्र पार पडले. या बैठकीत पर्यावरणपूरक गणेशोत्सवासंबंधी धोरण तयार करण्याकरिता जन सहभाग व्हावा म्हणून मा. आयुक्तांनी दर महिन्याला महापालिकेमार्फत बाप्पा कट्टा सुरू करण्याचे निश्चित केले आहे. या चर्चासत्रात सहभागी झालेल्या गणेश मंडळे, मूर्तिकार, इतर नागरिकांच्या अडचणी, समस्या, सूचना आयुक्तांनी जाणून घेतल्या, तसेच त्यांच्याकडून लेखी समस्या आणि सूचना मागविण्यात आल्या आहेत. या सर्व सूचना, अडचणींचा विचार करून, उपाययोजनात्मक पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे धोरण तयार केले जाणार आहे. हे धोरण बनविण्यासाठी जनतेचा सहभाग असावा यासाठी 'बाप्पा कट्टा' हे फोरम चालवण्याचे निश्चित केले आहे.

दर महिन्यातून एकदा या बाप्प कट्ट्याचे आयोजन केले जाईल. त्यात मूर्तिकार, त्यांच्या संघटनांचे पदाधिकारी, पर्यावरण प्रेमी, नागरिक आदी सहभागी होतील. गणेशोत्सवाचे मांगल्य टिकवून पर्यावरण पूरक गणेशोत्सव कसा साजरा करावा, ते करतान आलेल्या अडचणी कशा सोडवाव्यात, नाविन्यपूर्ण उपक्रम कसे राबवावे यावर चर्चा करण्यात येईल. अशा प्रकारचा बाप्पा कट्टा राबविणारी मिरा भाईंदर ही पहिली महापालिका आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच माघी गणपती आणि भाद्रपद मधील गणेशोत्सवाकरिता नियोजन सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या बाप्पा कट्ट्यातून आलेल्या सूचनांमधील अधिक पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजारा करता येणार आहे. या चर्चासत्रात मिरा भाईंदर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, माहिती व जनसंपर्क अधिकारी जितेंद्र कांबळे, सहाय्यक आयुक्त, गणेश मंडळ पदाधिकारी, मूर्तिकार, पर्यावरण दुत आदी उपस्थित होते.